आजचा दिनविशेष
१९१९ : अफगाणिस्तानला युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य मिळाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १९ ऑगस्ट २०२५ | अंक २४१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# मराठवाड्यात मृत्यूचं तांडव, तुफान पावसाने सगळं उद्ध्वस्त; मदतीसाठी थेट मिलिटरी दाखल!



## मराठवाड्यात कोणत्या जिल्ह्यात किती लोकांचा मृत्यू

मिळालेल्या ताज्या माहितीनुसार पावसामुळे मराठवाड्यात आतापर्यंत एकूण सहा जणांचा मृत्यू झाला आहे. यात नांदेडमध्ये तिघांचा, बीडमध्ये दोघांचा तर हिंगोलीत एका व्यक्तीचा मृत्यू झालाय. पुण्यातून मागविलेली मिलिटरीची 20 लोकांची टीम नांदेडला रवाना झाली आहे. बीड जिल्ह्यातही एनडीआर एफची टीम

राज्यात सध्या तुफान पाऊस कोसळतोय. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई, विदर्भासह मराठवाड्यातही पावसाने तांडव घातले आहे. लाखो हेक्टर शेतीचे पावसामुळे मोठे नुकसान झालेले आहे. दरम्यान, मराठवाड्याच्या काही जिल्ह्यांत तर पावसाने अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. काही जिल्ह्यांत अनेक लोकांचा मृत्यू झाला असून छत्रपती संभाजीनगरात बचावकार्यासाठी एनडीआरएफ टीमसोबत मिलिटरही दाखल झाली आहे.

**मराठवाड्याती मलिटरीला पाचारण**

मराठवाड्यातील पावसाच्या स्थितीबाबत विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या या माहितीनुसार बचावकार्यासाठी मराठवाड्यात एनडीआरएफ एसडीआरएफसोबत मिलिटरीलाही पाचारण करण्यात आले आहे. मिलिटरीचे 20 जवान मतदाकार्यासाठी मराठवाड्यात दाखल झाले आहेत. जितेंद्र पापळकर यांची नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली आहे. या बैठकीत फडणीसांनी पावसाचा आढवा घेतला असून आवश्यक ते सर्व निर्देश दिले आहेत.

**नांदेडमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली**

ज्या ठिकाणी पाणी असेल त्या ठिकाणी शाळेच्या सुट्टीबाबत सूचना फडणवीसांनी सूचना दिल्या आहेत. तसेच अडकलेल्या लोकांना राहण्या खाण्याची सोय करण्याचाही सूचना फडणवीसांनी दिलेल्या



आहेत. सध्या नांदेडमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांचे बचावकार्य सुरू आहे. सर्व नागरिक सुरक्षित असल्याची माहिती असली तरी या पावसामुळे जनावरांचा मृत्यू झाला आहे.

**परभणीत कापसाच्या पिकात गुडघाभर पाणी**

मुसळधार पावसामुळे मराठवाड्यातील सव्वालाख हेक्टर शेतीक्षेत्र बाधित झाले आहे. सध्या पाऊस सुरू असून पंचनाम्यांना सुरुवात झाली आहे. मुसळधार पावासमुळे परभणी जिल्ह्यातही शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील गौडगाव येथे अतिवृष्टीसदृश जोरदार पाऊस झाला. शेतात उभे असलेले कापूस आणि सोयाबीनचे पीक पाण्याखाली गेले आहे. शेतकऱ्यांनी मेहनतीने लागवड केलेल्या कापसामध्ये गुडघाभर पाणी साचल्याने कापसाचे आणि सोयाबीनचे प्रचंड नुकसान झाले आहे. उभ्या पिकांमध्ये शेतकऱ्यांनी पोहोत आम्हाला लाडकी बहीण योजना नको, पंचनामे करून नुकसानीची भरपाई द्या अशी मागणी केली आहे. शेतात पाणी साचल्याने कापसामध्ये माशा सोडायची वेळ आली म्हणत शेतकऱ्यांनी राग व्यक्त केला आहे.

### धुनकेश्वर हे डोंगरपट्ट्यातील तेरा शिवलिंगांपैकी एक प्राचीन दैवत:- केशव महाराज पवार

# देवामध्ये भेदभाव करु नका शिव-हरी एकच आहेत.

वडवणी/प्रतिनिधी देवामध्ये कधीही भेदभाव करू नये. शिव-हरी वेगळे नसून ते एकच आहेत.म्हणूनच भेदभाव न करता भक्तिभावाने पूजा केली पाहिजे.ईश्वराला नावं अनेक असली तरी तो सर्वत्र एकच आहे.माणसा-माणसांत, पंथा- पंथात किंवा देव-देवतांमध्ये भेदभाव निर्माण करणे चुकीचे आहे. समाजामध्ये ऐक्य आणि सौहार्द वाढावे, भक्ति-भावातूनच खरा परमार्थ साधाता येतो.असे धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव धुनकवाड येथे चौथा श्रावण सोमवार आयोजित कीर्तन सोहळ्यात बोलताना शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार यांनी भाविक-भक्तांना एकात्मतेचा संदेश दिला. यावेळी केशव महाराज पवार यांना चौथ्या



श्रावण सोमवारच्या महाप्रसादाचे यजमान यांच्या वतीने ग्रामदैवत धुनकेश्वराची प्रतिमा,फेटा,पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.गेल्या दहा वर्षांपासून धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव आयोजित केला जात आहे.यावर्षीही श्रावण महिन्यातील चार सोमवारी नामांकित किर्तनकारांचे किर्तन झाले यामध्ये पहिला श्रावण सोमवार ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके,दुसरा श्रावण सोमवार ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे,तिसरा श्रावण सोमवार ह.भ.प. वैराग्यमुर्ती रामकृष्ण बापु रंधवे तर चौथा सोमवार ह.भ.प.केशव महाराज पवार यांच्या सुश्राव्य वाणीतून किर्तन सेवा झाली व महाप्रसाद झाला. पुढे बोलताना केशव महाराज म्हणाले की, डोंगरपट्ट्यातील तेरा प्राचीन शिवलिंगांपैकी धुनकेश्वर हे एक महत्त्वाचे स्थान असून या पवित्र स्थळी धुनकेश्वर क्षेत्राचे धार्मिक महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, डोंगरपट्ट्यात तेरा प्राचीन शिवलिंगांची परंपरा आहे. यापैकी धुनकेश्वर हे एक प्राचीन आणि ऐतिहासिक शिवलिंग असून तेरा शिवलिंगांमध्ये धुनकेश्वरला विशेष मान आहे.येथे श्रावण महिन्यात भाविकांची विशेष गर्दी असते.जो अमृत पचवतो तो देव परंतु जो वीष पोचवतो तो महादेव,निळकंठेश्वर हे होय.जिवनात परमार्थ करत असताना निष्ठेने व प्रमाणीक करा असेही शेवटी सांगितले. कीर्तनस्थळी पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांचे कीर्तन श्रवण केले व महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते. यावेळी वातावरण भक्तिमय झालं होतं. हजारो भाविकांनी धुनकेश्वराचे दर्शन घेतले असुन हर-हर महादेव,धुनकेश्वर महाराज की जय या जय घोषाणे परिसर दणाणून गेला होता.

# परळीत नदीपात्रात कारसह चौघे वाहून गेले, एकाचा मृत्यू तर नांदेड येथे दोन महिलांचे मृतदेह सापडले

राज्यात गेले दोन ते तीन दिवस पावसाचा धुमाकुळ सुरु असून विविध अपघातात किमान तिघांचा मृत्यू झाला आहे. परळी तालुक्यातील कवडगाव हुडा येथील रस्त्यावरील नदीपात्रात काल रात्री एक कार वाहून गेली. या कारमध्ये चार जण बसले होते त्यापैकी तिघांना बाहेर काढण्यामध्ये प्रशासनाला यश आले असून एकाचा मृत्यू झाला आहे. तर नांदेडच्या मुखेड तालुक्यातील हसनाळ गावातील दोन महिलांचे मृतदेह सापडले आहेत.



राज्यात पावसाचा जोरदार मारा सुरु असून अनेक नद्यांना पुर आला आहे. परळी हुडा कौडगाव येथील पुलावरून जात असताना पाण्याचा अंदाज न आल्याने फोर व्हीलर गाडी पुलावरून नदीच्या पात्रात वाहून गेली. रात्री एक वाजताच्या सुमारास पोलिसांना माहिती मिळाली की दिग्रस येथील काही तरुण गाडीमधून जात असताना कवडगाव हुडा येथे पाण्याच्या प्रवाहाने वाहून गेले आहेत.

# भोकर तालुक्यात पावसाने हाहाकार शेतकरी झाला हवालदिल.

भोकर:-तालुक्यामध्ये गेल्या 5 दिवसा पासुन पडत असलेल्या मुसळधार तर सततधार पावसामुळे जनजिवन विस्कळीत झाले आहे. नदी नाले तुंडुंब भरुन वाहत असुन शेतकरी हवालदिल झाला आहे. संपुर्ण नद्या दुथडी भरुन वाहत असुन काही नद्यांनी धोक्याची पातळी गाठली आहे.शेतीमध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे कापुस,सोयाबीन,तुर,हळद यासह अनेक पिकांचे नुकसान झाले आहे,हाता तोडांशी आलेला घास निसर्गाच्या कोपाने हिरावून नेल्यामुळे,लाखो रुपये खर्च करुन बि बियाने,खत,औषधी,फवारनी,निंदन, पाळी,खुरपनी,साठी झालेला खर्च व्याजाने पेसे



काढुन शेतात टाकल्यामुळे शेतक-यांच्या तोडांचे पाणीच पळाले आहे.शेतकरी निसर्गा सोबत जुगार खेळतो, भोकर तालुक्यातील सुधा प्रक्लप 100% भरल्यामुळे सुधा नदीला पुर येवून नदीकाठची गावे रेणापुर,कोळगाव बु.कोळगांव खुर्द,नांदा,गारगोटवाडी,दिवशी बु,दिवशी खु,गावच्या शेतीचे जास्त प्रमाणात नुकसान झाले आहे.सतत पाऊस चालु असल्यामुळे गोर गरीब,मजुर,कांम बंद असल्यामुळे घरातच बसुन आहेत,त्यामुळे त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शहरातील बाजारपेठेमध्ये पाणी शिरले आहे.



बीड: दिनांक 16 ऑगस्ट 2025 शनिवार रोजी श्री व्यंकटेश पब्लिक स्कुल प्राथमिक विभाग अदित्य नगरी बीड येथे गोकुळाष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी राधा कृष्णाच्या वेशभूषेत उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णांच्या गाण्यावर नृत्य सादर केले. कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य हावळे सर, मुख्याध्यापक धुमाळ सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# माजलगाव तालुक्यातील साळेगाव परिसरामध्ये अचानक मुसळधार पाऊस,

**सोयाबीनच्या शेतात तलावाचे रूप शेतकरी भारत गायके यांच्या तीन एकर सोयाबीन मध्ये पाणीच पाणी**

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी सध्या मराठवाड्यात मुसळधार पावसाने थैमान घातले आहे व शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये पिकवलेले पिके सध्या पाण्यामध्ये वाहून जात आहेत माजलगाव तालुक्यातील साळेगाव येथील शेतकरी भारत गायके यांच्या तीन एकर सोयाबीन मध्ये अक्षरशः सोयाबीन दिसत नाही गुडघाभर पाणी सोयाबीनच्या शेतामध्ये तलाव चे स्वरूप आल्याचे दिसून येत शेतकऱ्याच्या सोयाबीनच्या शेतामध्ये गुडघाभर पाणी, सध्या शेतकरी हवालदिन झाला आहे



लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी शेतकरी करीत आहे

# बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा " देशभक्तीपर गीते" अभियान संपन्न

बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती तर्फे" "देशभक्तीपर गीते" या अभियानातर्गंत दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोज गुरुवारला मनपा शाळा रहाटगाव येथे बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे देशभक्तीपर गीते विद्यार्थांना शिकविण्यात आलीत. बांधिलकी प्रतिष्ठानच्या कोषाध्यक्षा सौ. छायाताई पाथरे संगीत विशारद यांच्या साथीला श्री. गजेंद्र पाथरे तसेच बांधिलकी प्रतिष्ठनच्या संस्थापक अध्यक्षा ॲड.डॉ. नीता प्रफुल्ल कचवे ह्या होत्या. विद्यार्थ्यांचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. देशभक्ती मुल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजावीत , वृद्धिंगत व्हावी हाच हेतू बांधिलकी प्रतिष्ठनचा हे अभियान राबविण्यामागे आहे. विद्यार्थांनी देशभक्तीपर गीते शिकून स्वातंत्र दिनाच्या सोहळ्याला देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले सौ . छायाताई पाथरे यांनी १५ ऑगस्ट२०२५ स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमास हजेरी लावून गीतांना हार्मोनियमची साथ दिली. त्यामुळे घेतलेल्या उपक्रमाची फलनिष्पत्ती मिळाल्याचा आनंद झाला. सौ छाया पाथरे यांनी जेष्ठ नागरिकांप्रती आदर, काळजी व्यक्त करण्याबाबतची शपथ विद्यार्थांना दिली.

मनपा शाळा रहाटगाव येथील चुनचुनीत आणि शिस्तबद्ध विद्यार्थी पाहून शिक्षकवर्ग घेत असलेल्या मेहनतीची प्रचिती आली. शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन केले जाते हे बघून मनपा शाळा कोणत्याही सीबीएसी खाजगी शाळेपेक्षा कमी नाही हे लक्षात आले.

# शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांच्या बदल्या रद्द करण्याची ग्रामस्थांची मागणी लिंबागणेशकर पालकांचा आक्रमक पवित्रा

लिंबागणेश (दि. १८):बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत संवर्ग १ ते ४ मधील तब्बल ५ पैकी ४ शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्या झाल्या असून या निर्णयाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. अचानक झालेल्या या बदल्यांमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने ग्रामस्थांनी बदल्या तात्काळ रद्द करण्याचे निवेदन शिक्षणमंत्री दादा भुसे, खा. बजरंग सोनावणे, आ. संदिप क्षीरसागर तसेच जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना सादर केले आहे. बदल्या रद्द न झाल्यास पालक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीचा ठरावआज (दि. १८) सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात तसेच शाळेत पालक व ग्रामस्थांची तातडीची बैठक झाली.या बैठकीत ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर केला असून, त्यासह पालकांच्या स्वाक्षरीचे पत्र जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींना पाठवण्यात आले आहे.

या बैठकीस शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर वाणी, पत्रकार हरिओम क्षीरसागर, लेनाजी गायकवाड, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, दिनेश जाधव, संतोष भोसले, अशोक वाणी, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, चेतन कानिटकर, तुकाराम गायकवाड, अशोक थोरात, मंगेश जाधव, आनंद बारगजे, संदिप मुळे आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुणवत्ता वाढवणारे शिक्षक गमावण्याचा धोकालिंबागणेश शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंत सुमारे १२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुख्याध्यापक आबासाहेब हांगे व शिक्षक अमर पुरी,




संदिपान आगाम, भरत चौरे, माधुरी कुलकर्णी यांच्या प्रयत्नांमुळे या शाळेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढली आहे. इतकेच नव्हे तर गावातील इंग्लिश स्कूलमध्ये शिकणारी मुलेही पुन्हा जिल्हा परिषद शाळेत दाखल झाली आहेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले होते. अशा परिस्थितीत या शिक्षकांची बदली म्हणजे मुलांच्या भवितव्याशी खेळ असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.आंदोलनाची हाकशिक्षकांच्या बदल्या रद्द न झाल्यास लिंबागणेशकर रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्यास भाग पाडले जाईल, असा इशारा पालक व ग्रामस्थांनी दिला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १९ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## कल्पना विश्व...



हे मानवा कल्पनेच्या विश्वात रममाण होऊ नकोस तू वास्तव स्वीकारायला शिकायला हवे.

जीवन जगायचे आहे तर आपल्या स्वप्नांची पूर्तता करायला शिकले पाहिजे. आणि स्वप्नांची पूर्तता करायची असेल तर सर्वांग सुंदर विचारांची पूजा मांडून, शब्द फुलांची पाखरण करून, विचारांना कृतीची जोड द्यायला हवी. तेव्हा आपले स्वप्न ध्येय उद्दिष्टे निश्चित पूर्ण करता येतात.

आलेल्या संकटांशी झुंज द्यावी. झुंज देता देता दमायला होते. अगदी जीवनाचे चार हात न करण्याचे, जीवन संपवण्याचे विचार मनी डोकावले जातात. पण ह्या अविचारी शब्दांना बाजूला करून चांगल्या विचारांची पेरणी, मशागत करून जीवन उत्तम कसे जगता येईल याचा विचार हवा. आणि आपले जीवन असेच घडवावे.

आपल्या जन्मदात्या माय पित्याने जे आपल्याला जीवन दिले आहे त्या जीवनाला कष्टाची, कर्तव्याची साथ देऊन मातापित्याच्या वृद्ध काळामध्ये त्यांनाही सांभाळायला हवे. आपल्याच मातापित्याने संस्कारांची जी शिदोरी दिलेली आहे त्या शिदोरीचे विस्मरण होता कामा नये.

शिव विचारांचा संत विचारांचा आपल्या मनावर, विचारावर पगडा हवा.

जीवनात आपण जे पेरतो तेच आणि तेच उगवते. तुम्ही प्रेम पेराल प्रेम उगवेल. तुम्ही द्वेष पेराल द्वेष उगवेल. उत्तम भावनांची मशागत केली असता भावना उगवायला वेळ लागत नाही.

आपल्याच घरातील छोटे मूल आपण जे बोलतो त्या बोलाचे प्रतिसाद बोबड्या शब्दांमध्ये देतात. याचा अर्थ काय आपण जे शिकू तेच ते बोलतात आणि तेच ते करतात तेच पाहतात तसेच वागतात. या यासाठी उत्तम विचार, उत्तम भावना, उत्तम संस्कार कथा यातून मूल घडवावे.

एकदा का त्याच्या मनाची बुद्धीची उत्तम मशागत झाली तर ते मुल जगात वावरताना कुठेही वाईट विचारांची पेरणी मुळीच करणार नाही.


तुझ्या जीवनाची ज्योत तुलाच पेटवायची आहे. तुझ्या जीवनाचा कंदील होऊन तुला वाटाड्या बनायचं आहे. आणि स्वयंप्रकाशित होऊन जगायचे आहे. आपला प्रकाश इतरांनाही द्यायचा आहे.

हेच जीवनाचे शास्त्र आहे.

वसुधा वैभव नाईक
धनकवडी,जिल्हा - पुणे
मो. नं. 9823582116

# शिक्षणाचे महत्त्व

शिक्षण हा समाजाचा आत्मा आहे. मुलांना आणि मुलींना ही ज्ञानगंगा उपलब्ध करुन देणं हे एखाद्या विषयावर आपण मोर्चा काढण्यापेक्षाही जास्त महत्वाचं आहे असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च विद्याविभूषित होते. शिक्षण हे वाघीणीचं दूध आहे असं ते नेहमी म्हणायचे. शिक्षणासारखा दुसरा सर्वोत्तम गुरू नाही या मतावर बाबासाहेब ठाम होते. एखाद्या समाजाची प्रगती साध्य करायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असं ते म्हणायचे. शिक्षणाबाबत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे काय विचार होते.आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात शिक्षणाला खूप महत्त्व आहे. आजच्या काळात शिक्षणाचा स्तर वाढवण्यासाठी अनेक पद्धती अवलंबल्या जातात. सध्याच्या काळात संपूर्ण शिक्षण पद्धतीच बदलली आहे. आता आपण बारावीनंतर दूरस्थ शिक्षण कार्यक्रमाद्वारे नोकरीसोबतच अभ्यास करू शकतो. शिक्षण फार महाग नाही, कोणीही थोडे पैसे असूनही शिक्षण चालू ठेवू शकतो. दूरशिक्षणाच्या माध्यमातून आपण कोणत्याही मोठ्या आणि प्रसिद्ध विद्यापीठात अगदी कमी फीमध्ये सहज प्रवेश घेऊ शकतो. इतर लहान संस्था देखील विशिष्ट क्षेत्रातील कौशल्यांना चालना देण्यासाठी शिक्षण देत आहेत.




शिक्षण स्त्री आणि पुरुष दोघांसाठीही तितकेच आवश्यक आहे, उज्वल भविष्यासाठी आवश्यक साधन असण्यासोबतच देशाच्या विकासात आणि प्रगतीतही ते अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. अशाप्रकारे योग्य शिक्षण दोघांचे उज्ज्वल भविष्य घडवते. सुशिक्षित नेतेच राष्ट्र घडवतात आणि त्याला यश आणि प्रगतीच्या मार्गावर घेऊन जातात. चांगले शिक्षण जीवनात अनेक उद्देश पूर्ण करते जसे; वैयक्तिक उन्नती, सामाजिक स्थिती वाढवणे, सामाजिक आरोग्य सुधारणे, आर्थिक प्रगती, राष्ट्राचे यश, जीवनातील ध्येय निश्चित करणे, सामाजिक समस्यांची जाणीव करून देणे आणि पर्यावरणीय समस्या आणि इतर सामाजिक समस्या सोडवण्यासाठी उपाय प्रदान करते .

ज्ञान ही अशी संपत्ती आहे की ती कोणी चोरू शकत नाही आणि कोणी हिसकावून घेऊ शकत नाही. ही एकमेव संपत्ती आहे जी वाटली तरी कमी होत नाही, उलट वाढतच जाते.
आपल्या समाजातील सुशिक्षितांना वेगळा मान असतो आणि लोकही त्यांचा आदर करतात हे आपण पाहिलेच असेल. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला आपण साक्षर व्हावे, प्रशिक्षित व्हावे असे वाटते, म्हणूनच आजच्या काळात आपल्या जीवनात शिक्षणाला खूप महत्त्व ज्ञान ही अशी संपत्ती आहे की ती कोणी चोरू शकत नाही आणि कोणी हिसकावून घेऊ शकत नाही. ही एकमेव संपत्ती आहे जी वाटली तरी कमी होत नाही, उलट वाढतच जाते. आपल्या समाजातील सुशिक्षितांना वेगळा मान असतो आणि लोकही त्यांचा आदर करतात हे आपण पाहिलेच असेल. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला आपण साक्षर व्हावे, प्रशिक्षित व्हावे असे वाटते, म्हणूनच आजच्या काळात आपल्या जीवनात शिक्षणाला खूप महत्त्व आहे.

शिक्षण हे सकारात्मक विचार आणून लोकांच्या विचारात बदल घडवून आणते आणि नकारात्मक विचार दूर करते. आपल्या बालपणात आपल्या मनाला शिक्षणाकडे नेण्यात आपले पालक खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. ते आम्हाला नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये दाखल करून चांगले शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात. हे आम्हाला तांत्रिक आणि अत्यंत कुशल ज्ञान देते तसेच जगभरात आमच्या कल्पना विकसित करण्याची क्षमता देते. शिक्षण आपल्याला अधिक सुसंस्कृत आणि चांगले शिक्षित बनवते. हे आपल्याला समाजात एक चांगले स्थान आणि नोकरीमध्ये अपेक्षित स्थान प्राप्त करण्यास मदत करते.

हे आपल्याला चांगले डॉक्टर, अभियंता, पायलट, शिक्षक इत्यादी बनण्यास सक्षम करते जे आपल्याला जीवनात बनायचे आहे. नियमित आणि योग्य शिक्षण आपल्याला जीवनाचे ध्येय बनवून यशाकडे घेऊन जाते. पूर्वीच्या काळातील शिक्षणपद्धती आजच्या तुलनेत खूपच कठीण होती. सर्व जातींना त्यांच्या इच्छेनुसार शिक्षण मिळू शकले नाही. भरमसाठ फी असल्याने प्रतिष्ठित महाविद्यालयात प्रवेश मिळणेही अवघड होते. पण आता दूरशिक्षणातून शिक्षण घेऊन पुढे जाणे खूप सोपे आणि सोपे झाले आहे.

शिक्षण कोणत्याही मोठ्या कौटुंबिक, सामाजिक आणि अगदी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्याची क्षमता प्रदान करते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाचे महत्त्व आपल्यापैकी कोणीही दुर्लक्ष करू शकत नाही. शिक्षणाचे आपले आयुष्य घडवण्यासाठी खूप महत्त्व आहे. शिक्षण माणसाला स्वावलंबी बनवते.

**श्रीमती प्रज्ञा सिद्धार्थ घोरपडे**
**मालवणी टाऊनशिप इंग्रजी मुंबई पब्लिक स्कूल मालाड.**

## होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

केज (प्रतिनिधी)दि.१८ : तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले. कार्यक्रमाला राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथींमध्ये मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक



दत्ता शिंदे, माजी सरकारी वकील ॲड. प्रकाश शिंदे, पुणे सीआयडीचे माजी पोलीस उपअधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, माजी प्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते. आठवणींना उजाळाया सोहळ्यात संभाजीराव शिंदे व अंकुशराव शिंदे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनापासून ते आजवरच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. दोघेही बनेश्वर शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने शिक्षण संस्थेबद्दल व होळच्या मातीतून मिळालेल्या संस्कारांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या भाषणातून गावाशी असलेली घट्ट नाळ प्रकर्षाने जाणवली.

# अप्पर कुंडलिका धरणातुन मामला, तीगांव, चिंचोटी तलावात पाणी सोडा लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांची मागणी

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी वडवणी तालुक्यातील सर्वात मोठी नदी असलेल्या अप्पर कुंडलिका नदीवरील सोन्नाखोटा येथे उभारण्यात आलेला अप्पर कुंडलिका प्रकल्प तसेच उपळी येथे उभारण्यात आलेला कुंडलिका प्रकल्प मागील अनेक दिवसांपासून तुडुंब भरला असून वरच्या बाजूला झालेल्या पावसाचे पाणी नदीपात्रातून खाली वाहून जात आहे. हे पाणी मामला, चिंचोटी आणि तीगांव या लघु प्रकल्पांना सोडले तर ते लघु प्रकल्प तुडुंब भरतील कारण लघु प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा आहे. या लघु प्रकल्पांना पाणी सोडण्यासाठी पाटबंधारे विभागाने तत्काळ पावले उचलावीत आणि दुष्काळी भागाला मदत करावी अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी केले आहे.

बीड जिल्ह्याच्या इतर भागांमध्ये



सध्या मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे अनेक जलप्रकल्प पाण्याने तुडुंब भरलेले आहेत. वडवणी तालुक्यात सर्वात मोठी नदी असलेली कुंडलिका नदी ही बीड तालुक्यातून वाहत येते. वरच्या बाजूला मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे वडवणी तालुक्यातील अप्पर कुंडलिका प्रकल्प आणि उपळी येथील कुंडलिका प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत. वडवणी तालुक्यात मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला नसल्यामुळे या तालुक्यातील पाण्यावर अवलंबून असलेले साधे लघु प्रकल्प देखील भरलेले नाहीत. या तालुक्यातील मामला, चिंचोटी, साळिंबा आणि तीगाव हे लघू प्रकल्प अद्यापही 20 ते 25 टक्के भरलेले आहेत. त्यामुळे इथं जलसाठा होणे आवश्यक आहे. पावसाळा केवळ एक महिना राहिला आहे. आणि पुढच्या काळात पाऊस पडेल असे चिन्ह दिसत नाहीत. सध्याही वडवणी तालुक्यात अत्यंत कमी पाऊस पडलेला आहे. त्यामुळे तीगाव, चिंचोटी आणि मामला या भागातील दुष्काळी परिस्थिती टाळण्यासाठी या तलावात सोन्नाखोटा येथील अप्पर कुंडलिका प्रकल्पाचे पाणी बंदिस्त पाईपलाईन द्वारे सोडण्यात यावे अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा तीगावचे सरपंच राज पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे.

अन्यथा टँकरने पाणी प्यावे लागते वडवणी तालुक्यातील मामला, चिंचोटी, तीगाव, चिंचाळा, पिंपरखेड, राजा हरिचंद्र पिंपरी या परिसरात दरवर्षी कमी पाऊस पडतो मात्र हे लघु प्रकल्प जर पाण्याने भरले तर या भागातील पाणी पातळी थोडीफार का होईना टिकून राहते मात्र या वर्षी लघु प्रकल्प केवळ 25 टक्के भरलेले आहेत पावसाळा संपत आलेला आहे आणि जर लघु प्रकल्प भरले नाहीत तर उन्हाळ्यामध्ये या भागातील जलस्त्रोत खूप खोलवर जातो आणि या भागात पिण्याच्या पाण्याची देखील पंचायत होते त्यामुळे टँकरने पाणी पुरविण्याची वेळ या भागातील गावावर येते. हे टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावेत आणि या तलावात पाणी सोडण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील यांनी केली. अनेक गावांना होणार फायदा

मामला, चिंचोटी, तीगाव या तीन तलावात पाणी सोडल्याने मामला तिगाव चिंचोटी हरिश्चंद्र पिंपरी बाहेगवान चिंचाळा केंडे पिंपरी धानोरा साळींबा आदी गावांना फायदा होणार आहे. कारण हे तलाव भरल्यानंतर सांडव्याद्वारे वाहणाऱ्या वाहणारे पाणी खालील भागामध्ये जमिनीत पाणी मुरले जाते त्याचा परिणाम या भागातील शिवारांना फायदा होतो.

### आमदार प्रकाश दादांची घेतली भेट

माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके हे विकासाच्या दृष्टीने वेळोवेळी प्रयत्नशील असतात. माजलगाव मतदार संघातील अनेक प्रश्न ते सहजपणे सोडवतात हा प्रश्न देखील आमदार प्रकाश दादा सोळंके प्रशासनाकडून सोडवून घेतील याची खात्री एडवोकेट राज पाटील यांना आहे. त्यामुळे त्यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांची सोमवारी सकाळी भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. आमदार दादांनी तत्काळ प्रशासनाला या संदर्भात पावले उचलण्यासंदर्भात सुचना केली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १९ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## महिलांनी महिलांना समजून घेतले पाहिजे

स्त्री जन्मा तुझी कहाणी कितीदा प्रतिमेने वर्णावी
खोल,क्रूर,त्या जखमांची विधात्याने पावती द्यावी...

सजीवसृष्टीची निर्मिती ही दोघांमुळे घडते,म्हणजे स्त्री व पुरुष दोन्हीही घटक तितकेच महत्त्वाचे असतात.दोघांशिवाय दुसऱ्या जीवाची निर्मिती अशक्य गोष्ट. महिलेला वरदान की शाप तेच आता या जगात समजत नाही,बाळाची सुखरूप वाढ होण्याची जागा आईच्या गर्भपिशवीलाच का दिलेली आहे?तिच्या शरीराची रचना यासाठीच का केलेली आहे? पुरुषाला का बाळाला जन्म देता येत?काही तरी कारणे आहे की नाही?प्रत्येक आई हे वरदान समजते आणि त्या चिमुकल्या जीवाला आपल्या पोटात ९ महिने,९ दिवस वाढवते...त्याची नित्य काळजी घेते? बाळाला जन्म देताना तिचा तो दुसरा जन्मच असतो...किती प्रसव वेदना सहन करत असते..एका निष्पाप जीवाला जन्म देण्यास.स्त्रीमध्ये X, X तर पुरुषांमध्ये X,Y अशी गुणसूत्रे असतात.X,X गुणसूत्रे एकत्र आली तर मुलगी ,X,Y गुणसूत्रे एकत्र आली तर मुलगा होतो...हा निसर्गनियम आहे.

पहिल्या मुलीचा जन्म म्हणजे लक्ष्मीचा जन्म समजतात अर्थात "पहली बेटी,धन की पेटी." पण,अजून ही काही घरात मुलालाच वंशाचा दिवा समजतात. आपला वंश पुढे चालविण्यासाठी मुलाच्या जन्माचा अट्टाहास धरतात...अन् त्यासाठी कित्येक मुक्या कळ्या गर्भातच मारल्या जातात तर काहींचा जन्मानंतर आतोनात छळ केला जातो.वंशासाठी कित्येक बाळांना जन्म दिला जातो.... अन् त्यांना पुन्हा दुय्यम वागणूक दिली जाते.कधी कधी पुरुष मंडळी दोन,तीन लग्न ही करतात जर पहिल्या पत्नीला मुलगा होत नसेल तर?अघोरी उपचार ही केले जातात? काही बळी ही दिले जातात? किंवा अजून काही काही ??

एखाद्या मुलीच्या पतीचा मृत्यू झाला तर त्यालाही त्या पत्नीलाच जबाबदार धरले जाते? इतकेच नव्हे तर विधवा या उपाधीने तिची नित्य नेमाने छळवणूक केली जाते? तिच्याकडील सर्व मान,सन्मान हिसकावून घेतला जातो?तिने नटायचे नाही,हसायचे नाही,सौभाग्य देणं घालायचे नाही,तिला कोणी हळदी कुंकू लावायचे नाही, तिला कोणी पूजेला बोलवायचे नाही,पूजेला बसवायचे नाही,अजून काय काय?किती तरी मोठी यादी होईल या गोष्टींची?

मुलांचे शिक्षण,अभ्यास,डब्बे,त्यांचे क्लास,सासू सासरे यांचे करण्यात पत्नींचं थोडे दुर्लक्ष झाले तरी दोषी पत्नीलाच समजले जाते,ती गरोदर असताना ही तिच्यापासून पती कधी कधी दुरावतो? त्याला तिच्या वेदना समजत नाही,तिच्या भावना समजत नाही?तिला काय होते? काय हवे? काही घेणे देणे नसते? बऱ्याच वेळा घरातील भांडणाला सुनेला जबाबदार धरले जाते.ती घरात नवीन आलेली असते,तिला सर्वांनी समजून घेण्याची गरज असते तर,तिलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते.आजुबाजूला तमाशा पहायला लोक होतात बरोबर जमा. मुलगी २,११,२१,३१,४१,५१,६१,८१,९१ वर्षाची काही घेणेदेणे नाही?आई, बहिण,मुलगी,भावजय,आजी,काकू,मामी काही पाहिले जात नाही. महत्त्वाची ती बहिण ,लेक,आई आहे कोणाची हेच विसरले जाते? ते ही जाऊद्या ती माणूस आहेच हेच विसरून तिची शिकार करतात. हे दोन पायाचे हिंस्र पशु अवतीभवतीच,जवळचेच असतात? ती कशी राहते? तिने काय घातले? ती कशी बोलते? ती कशी चालते? ती कशी वागते? याचे पडलेले असते? पण,आपल्या नजरा कधी बदलतील?... याचे काही घेणेदेणे नसते? किती हिंस्र नजर असते? ती बदलण्याची गरज कधी भासत नाही? स्वतः ला आई,बहिण,लेक,सुन इत्यादी असते हे कसे विसरून जातात?अत्याचारांची यादी केली तर ती कधीच न संपणारी आहे.

एकविसाव्या शतकात वावरत असताना हे घडते?किती दुर्भाग्य?माणूस म्हणून जन्माला आलेली ही गिधाडे?याला सर्वप्रथम जबाबदार आपण महिलाच आहोत.एक महिला जोपर्यंत दुसऱ्या महिलेला समजून घेत नाही तोपर्यंत हे घडतच राहणार? एक स्त्रीच बाळाला जन्म देते,ती पण स्त्रीच असते ना? मग त्या निष्पाप मुलीचा काय दोष?तिने जर अन्यायाला विरोध केला,प्रतिकार केला तर हे चित्र थांबणार नाही का?ज्या मुलीचा पती जातो,पण तो कोणाचा तरी भाऊ,मुलगा,काका,मामा असतोच ना? मग दोष त्या पत्नीला का?जन्माला आला म्हणजे मृत्यूही होणारच ना?आज ना उद्या? मग विधवा म्हणून एक महिलाच दुसरीचा का छळ करते,नावे ठेवते,अपमान करते? तिचे हक्क डावलते?त्यात आघाडीवर महिलाच असतात? हे ही विशेष...त्या महिला कितीही शिकलेल्या असल्या तरी?त्या शिक्षिका असल्या तरी?काय म्हणायचे? या विचारांना. अजूनही काही गावात महिलांना पाळी आली की,त्यांना घराबाहेर काढले जाते,त्यांना अस्वच्छ जागेवर राहावे लागते? किंवा त्यांना घरातील कोणत्याच गोष्टींना हात लावून दिला जात नाही? ती पाळीच नसती आली तर ती आई होऊ शकली असती का? ते रक्त घाण असते का? हे ही आजकालच्या सुशिक्षित समाज म्हणून घेणाऱ्या समाजाला समजत नाही?घरात पूजाअर्चा असताना त्या महिलेला पाळी पुढे ढकलण्याचा गोळ्या दिल्या जातात? काय म्हणायचं? त्या महिलाही या गोळ्या खातात? खऱ्या दोषी त्याच आहेत? ज्या हा अन्याय सहन करतात,किंवा होवू देतात? महिलाच महिलांच्या गुन्हेगार आहेत?तिला आरामाची,मानसिक आधाराची,चांगल्या,पोषक आहाराची,वातावरणाची आवश्यकता असते?तेव्हाच तिला वाळीत टाकले जाते?तिला तेव्हा पापी समजले जाते,नवऱ्याला ही हात लावायची परवानगी नसते?

आजच्या समाजाला डोळसपणे पाहता येत नाही? खऱ्या शिक्षणाची,अभ्यासाची,शांतीची गरज आहे.यासाठी वेळोवेळी सेमिनार घेऊन, पथनाट्यातून,चित्रपटातून,मालिकांमधून,जाहिरातीतून या गोष्टींची जागरूकता करण्याची गरज आहे.विचारांची जागरूकता होणे गरजेचे आहे.एक महिला जेव्हा दुसऱ्या महिलेला समजून घेईल,तेव्हा चित्र खूप वेगळे असेल.आपण मानसिकतेचे गुलाम बनलेले आहोत.अन् आपल्याला गुलामीत राहायला अधिक आवडते हे खूप अविचारी आहे.विचारांनी प्रगल्भ होणे गरजेचे आहे,एकमेकांना समजून घेणे अन् सर्वात महत्त्वाचे माणुसकीचे बीज रोवण्याची खरी गरज आहे.माणूसच माणसाला समजून घेत नसेल तर काय उपयोग?

# ओतूर येथील चैतन्य विद्यालयातील अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात..

ओतूर येथील चैतन्य विद्यालयातील सन १९७१ - ७२ साली इयत्ता अकरावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार गावातील म्हसवंडी रोडवरील बोर घाटातील हॉलिडे होम ॲग्रो टुरिझम येथे उत्साही वातावरणात पार पडले. सुमारे २५ मित्र मैत्रिणींनी यात सहभाग दर्शविला. काही तांत्रिक अडचणींमुळे उपस्थित राहू न शकलेल्या बहुतांश सहकाऱ्यांचे दूरध्वनीद्वारे शुभ संदेश मिळाले. त्यात प्रामुख्याने या उपक्रमात सातत्याने पुढाकार घेणाऱ्या सौ. मंदाताई दांगट, अनंथा घोलप, एडवोकेट सोपान डुंबरे यांचा समावेश होता.
ह.भ.प. सन्माननीय गंगाराम बुवा डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या स्नेहसंमेलनाचे आयोजन सर्वश्री जयंत डुंबरे, अंबादास डुंबरे, शंकर फापाळे, सुभाष हांडे देशमुख आदींनी निसर्गरम्य अशा डोंगराच्या कुशीत वसलेल्या हॉलिडे होम ॲग्रो टुरिझम येथे खूप कुशलतेने केले होते. उपस्थितांत वय वर्षे सत्तरी पार केलेले बहुतांश सहकारी शिक्षक पेशातून सेवानिवृत्त झालेले असल्याने प्रत्येकाच्या विचाराचा गाभा प्रगल्भ असा होता. तो त्यांनी जवळजवळ सर्वांनीच आपल्या मनोगतातून व्यक्त केला. शिक्षण,



संस्कार आणि खरी मैत्री ही कधीच जुनी होत नाही. काळ कितीही बदलला बदलत गेला तरी या गोष्टी माणसाला खऱ्या अर्थाने समृद्ध करतात. हे सांगतानाच अकरावी उत्तीर्ण झाल्यानंतर जीवनाने आपल्याला वेगवेगळ्या वाटांवर नेऊन ठेवले. कुटुंबातील बिकट परिस्थितीशी झगडत कुणी शैक्षणिक क्षेत्रात, कुणी नोकरीत, कुणी व्यवसायात, कुणी समाजकार्यात तर कुणी आपली वडिलोपार्जित शेती सांभाळत कुटुंबाची मोठी जबाबदारी सांभाळण्यात रमले. आणि यशस्वीपणे आपल्या पायावर उभे राहिले. एवढेच नाही तर आपल्या मुलांनाही सर्वार्थाने सक्षम बनविले. अर्थातच याची जाणीव, ऋण व्यक्त करुन की, शिक्षकांनी आपणांस लावलेली शिस्त, दिलेले संस्कार, दिलेली जीवनमूल्ये यांच्यामुळेच हे सर्व शक्य झाले. या अनुषंगाने आपला जीवन प्रवास सांगताना त्या काळच्या शालेय जीवनातील आठवणीही चाळवल्या गेल्या. वेळेनुसार वाजविल्या जाणाऱ्या शाळेच्या घंटा, लिहिण्यासाठी बोरु - टाक यांचा वापर व आपसातील सुंदर अक्षर याची चर्चा, पुस्तके, केलेल्या खोड्या, परीक्षेची धाकधुक त्याअनुषंगाने विषयांची निवड, इंग्रजी विषयाची भीती, काहींनी तर इंग्रजी विषय घेऊन पहिल्याच फेरीत परीक्षा कसे पास झालो, याच वाटलेलं त्या वेळचे आश्चर्य. हे आज सर्व डोळ्यासमोर उभे केले.
कार्यक्रमाच्या सुरुवातीसच श्री. अंबादास डुंबरे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. तर माननीय श्री. गंगाराम बुवा यांनी या कार्यक्रम आयोजनाचा उद्देश सखोलपणे विशद केला. त्यांनी सांगितले की, या स्नेहसंमेलनाचे आपले हे तिसरे वर्ष आहे. आज आपण एकत्र आलो आहोत. हा फक्त एक कार्यक्रम नाही तर आपल्या जुन्या आठवणींचा उत्सव आहे. विचारांची देवाणघेवाण व्हावी, परस्पर विश्वास अधिक दृढ व्हावा याबरोबरच आपल्या कुटुंबातील समस्या, प्रश्न एकमेकांना शेअर करता याव्यात व मानसिक समाधान लाभावे हाही उद्देश यामागे आहे. गेल्या पन्नास वर्षात आपल्या आयुष्याने अनेक चढ-उतार दाखवले पण आपण सर्व प्रकारच्या बिकट परिस्थितीवर मात करुन आज यशस्वीरित्या सत्तरी पार केली. करत आहोत. ही देवाची कृपा म्हणावी लागेल. म्हणूनच एक दिवस स्वतःसाठी आनंदाने जगावा, जीवनाला अधिक प्रोत्साहन मिळावे, एकमेकांच्या यशस्वी जीवनातून प्रेरणा मिळावी. यासाठी या स्नेहसंमेलन सोहळ्याचे आयोजन.. गाणी गाऊन, फुगड्या खेळून, हास्यविनोद करुन आज आपण पुन्हा विद्यार्थी झालो, मनाने अधिक तरुण झालो आणि आपल्या मैत्रीच्या गाठी अधिक घट्ट झाल्या हीच आजच्या या स्नेहसंमेलनाची खरी कमाई आहे.
वेळेवर अल्पोपहार, स्वादिष्ट भोजन करुन दिवसभराच्या भरगच्च अशा प्रकारच्या कार्यक्रमानंतर अर्थातच पुढील वर्षीच्या सोहळ्याच्या आयोजनाविषयी सखोल चर्चा करुन सर्वजण आनंदाने परतले.

# देशभक्ती, ईश्वरभक्ती आणि ज्ञानभक्ती यांचा सुरेख संगम- डॉ. लक्ष्मण शिवणेकर

चिंचवड, पुणेः 79 व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आयोजित केलेले राष्ट्रभक्ती महाकविसंमेलन व रक्तदान शिबिर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि पोलीस खात्यातील अधिकारी तसेच राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी डॉ. लक्ष्मण शिवणेकर हे प्रमुख अतिथी होते. चिंचवड-चिखली जाधववाडी येथील श्री संत सावता महाराज मंदिराच्या सभामंडपात रक्तहितवर्धिनी सामाजिक संस्थेच्या वतीने राष्ट्रभक्ती महाकविसंमेलन आणि रक्तदान शिबिराचे आयोजन १५ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. जन्माष्टमी (दहीहंडी) आणि भारताचा स्वातंत्र्य दिवस या पवित्र पर्वप्रसंगी आयोजित देशभक्ती (कर्मयोग), ईश्वरभक्ती (भक्तियोग)



आणि ज्ञानभक्ती (ज्ञानयोग) यांचा सुरेख संगम झाल्याचा प्रत्यय आला असल्याचे प्रशंसोद्गार संमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलताना डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांनी काढले. शेवटी गझल सादर करून आनंद व्यस्त करताना आयोजक ॲड. रमेश अण्णा उंबरगे, नितीन चिलवंत , शिवकुमार बायस आणि सहकार्-यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. कार्यक्रमाची सुरुवात गौमातेचे पूजन, संत सावता महाराज, संत बसवन्ना आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीना पुष्पहार अर्पण करून सामुदायिक शिववंदनेने झाली. डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांनी दहीहंडीच्या निमित्ताने गोमातेचे पूजन करून ग्रंथहंडी साजरी करून ज्ञानभक्तीचा संदेश दिला. संत तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरी आणि संतवचन ग्रंथ या पवित्र ग्रंथांची टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.मान्यवर वारकरी संप्रदाय तसेच पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्ते आयोजकांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कारगिल विजय दिन, ऑगस्ट क्रांती दिन, स्वातंत्र्य दिन आणि श्रीकृष्ण जन्माष्टमी तसेच संत ज्ञानेश्वर महाराज ७५० वर्ष सुवर्ण महोत्सवी जन्म वर्ष आणि संत तुकाराम महाराज ३७५ वा वैकुंठ गमन वर्षानिमित्त देशभक्तीचा स्फुल्लिंग मनामनात जागवणारी काव्यपुष्पे अर्पण करण्यात आली. दिवसभर मुक्तपणे चाललेल्या या सुंदर कार्यक्रमात कवींनी देशभक्तीपर तसेच ईश्वरभक्तीपर गीतगायन व कवितावाचन २०० कवींनी केले. यातून देशातील परिस्थितीचे भान दर्शवणाऱ्या ज्ञानवर्धक ग्रंथांचे ग्रंथहंडीच्या माध्यमातून वितरण करण्यात आले . सहभागी कवी, वारकरी भक्त व रक्तदात्यांना पाहुणे आणि दिवानआप्पा अंबुरेसर यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रमाणपत्र आणि राष्ट्रपुरुषांचे ग्रंथ भेट देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली.


## उत्तम सदाकाळ यांना राजभवन येथे स्वातंत्र्यदिन स्वागत समारंभाचे निमंत्रण

पुणे प्रतिनिधी

जुन्नर तालुक्यातील मढ गावचे रहिवासी व करंजाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पदवीधर शिक्षक उत्तम निवृत्ती सदाकाळ यांना स्वातंत्र्य दिनानिमित्त राजभवन येथे होणाऱ्या स्वागत समारंभासाठी आमंत्रित केले होते.

उत्तम सदाकाळ यांना नुकतेच तहसील कार्यालयाकडून राज्यपालांच्या सस्नेह आमंत्रणाचे पत्र देण्यात आले होते. उत्तम सदाकाळ यांना त्यांच्या शिक्षण व साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन स्वागत समारंभासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

उत्तम सदाकाळ यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेला असून जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार



तसेच तालुका आदर्श पुरस्कार व शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत.

विशेष म्हणजे उत्तम सदाकाळ यांची "पाऊस" हि कविता इयत्ता दुसरीच्या पाठयपुस्तकातील अभ्यासक्रमात समाविष्ट केलेली असून शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी उत्तम सदाकाळ यांचा "कमाई" हा बालकथासंग्रह समग्र शिक्षा ग्रंथालय उपक्रमांतर्गत इयत्ता चौथी व पाचवीच्या मुलांसाठी निवडलेला आहे.

उत्तम सदाकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करंजाळे शाळेतील मुलांनी काव्यलेखनात उल्लेखनीय प्रगती केलेली असून मुलांनी लिहिलेल्या कवितांचा "निसर्गाची शाळा" हा कवितासंग्रह नुकताच समारंभपूर्वक प्रकाशीत झालेला आहे.

उत्तम सदाकाळ यांचे बालसाहित्य क्षेत्रात विशेष योगदान असून त्यांची आजपर्यंत 89 पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. दिल्ली येथील साहित्य अकादमीच्या बालसाहित्य पुरस्कारासाठी उत्तम सदाकाळ यांना नामांकनसुद्धा मिळाले होते. साहित्य क्षेत्रातील या भरीव कामगिरीबद्दल उत्तम सदाकाळ यांना अनेक मानाचे पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. त्यांच्या शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत मा.श्री.सी.पी.राधाकृष्णन ( राज्यपाल, महाराष्ट्र राज्य ), व श्रीमती सुमती आर. यांनी राजभवन येथील स्वातंत्र्यदिनाच्या स्वागत समारंभासाठी सस्नेह आमंत्रित केले होते.

राजभवनांकडून मिळालेल्या आमंत्रणाने भारवून गेलेल्या उत्तम सदाकाळ यांनी आजवर केलेल्या कामाचे, कष्टाचे खऱ्या अर्थाने चीज झाले अशी भावना याप्रसंगी व्यक्त केली. ग्रामीण भागातील मढ सारख्या खेडेगावात शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या उत्तम सदाकाळ यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या गावाबरोबर जुन्नर तालुक्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

# सुप्रसिद्ध वकील, कवी, निवेदक, ॲड.उमाकांत आदमाने यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद "पुणे शहर उपाध्यक्ष" पदी निवड

मराठी भाषा संवर्धनासाठी पूर्ण महाराष्ट्रभर कार्यरत असलेले, या संस्थेत मराठी साहित्यिक बंधु व भगिनीनां सर्व धर्मातील साहित्यिकांना सोबत घेऊन कार्य करणारी संस्था नावा रुपाला आहे, पुणे येथील सुप्रसिद्ध वकील, कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने, नोटरी भारत सरकार यांचे शैक्षणिक क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, सांस्कृतिक क्षेत्रात, आणि वकिली क्षेत्राबरोबर साहित्य क्षेत्रामध्ये सातत्याने लेखनकार्य, मार्गदर्शन करणारे आपल्या मार्गदर्शनातून आपले विचार गावागावापर्यंत पोहोचवणारे सुप्रसिद्ध वकील, कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने, नोटरी भारत सरकार यांची दि. ७/८/२०२५ रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद "पुणे शहर उपाध्यक्ष" पदी निवड झाली आहे, या निवडीचे पत्र संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. शरद गोरे व राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. शुभांगीताई काळभोर पुणे सह महाराष्ट्राची जिल्हा कार्यकारिणी आणि सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली. कवी ॲड. उमाकांत मधुकर आदमाने मूळ गाव बोरगाव काळे, जिल्हा लातूर परंतु सध्या स्थायिक पुणे येथून विविध सामाजिक, शैक्षणिक, व साहित्यिक चळवळीत सक्रीय असणारे सुप्रसिद्ध कवी ॲड. उमाकांत मधुकर आदमाने हे सन २००९ रोजी पासून शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय येथे वकीली



व्यवसाय करीत असून सन २०२० मध्ये त्यांची भारत सरकार नोटरी पदी देखील निवड झालेली आहे व नोटरी व्यवसाय सुद्धा प्रामाणिक पणे करीत आहेत तसेच वकिली व्यवसाया बरोबरच त्यांनी दरम्यानच्या काळात साहित्यिक विश्वात यशस्वी प्रवास करत साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संस्थेने कवी ॲड. उमाकांत मधुकर आदमाने यांची निवड झाली, त्यामुळे साहित्यिक क्षेत्रात देखील आपला ठसा प्रामाणिकपणे उमटविला आहे, अनेक राष्ट्रीय,राजस्तरीय, व जिल्हास्तरीय काव्यसंमेलनात सहभाग घेऊन त्यांनी आपल्या विविध विषयावरील कविता सादर केल्या. त्यांचे ध्येय हेच की जनसेवा हीच राष्ट्रसेवा समजून काम करणे, हे असून शैक्षणिक व सामजिक बांधिलकी या विचारातून अनेक गरजुवंत विध्यार्थाना शैक्षणीक साहित्य, गणवेश वाटप करून त्यांना आधार देण्याचे काम केले आहे, तसेच ते मुळचे मु. पो. बोरगाव काळे,ता.जि.लातूर या गावचे असून किल्लारी येथे झालेल्या भूंकपग्रस्त कुटुंबातील मुले आणि मुलींच्या सहभागातून त्यांना आर्थिक, सामाजिक, मग ती धान्य मागून त्यांच्यापर्यंत नेऊन देण्याचे काम त्यांनी घडवून आणलेले आहे, रा.सें.यो च्या माध्यमातून गाव मौजे पुणे, लातूर, सांगली, सातारा, बीड, उस्मानाबाद, नांदेड, राजस्थान, बेंगलोर येथे जाऊन दहा दिवसीय शिबिरात सहभाग घेऊन 'पाणी संरक्षण' "पाणी आडवा पाणी झिरवा" हा संदेश सर्व महाराष्ट्रभर पसरविण्याचे आतिशय मोलाचे काम केले असले तरी त्याच बरोबर वकिली व्यवसायात देखील त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे आणि चांगले काम करीत आहेत.

# शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार, मुख्यमंत्री घोषणा करणार, बड्या मंत्र्याने दिली माहिती

राज्यातील शेतकरी कर्जमाफीच्या प्रतिक्षेत आहेत. शेतकऱ्यांनी व शेतकरी नेत्यांनी याबाबत वारंवार मागणी केली आहे. अशातच आता शेतकरी कर्जमाफीबाबत मृदा आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी मोठ विधान केल आहे. त्यामुळे आगामी काळात शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून कर्जमाफी होणार असल्याचे समोर आले आहे. मंत्री संजय राठोड यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात.

शेतकऱ्यांचा यवतमाळमध्ये सन्मान

हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या 46 व्या स्मृतिदिनी यवतमाळच्या पुसद येथे एका पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील 13 शेतकऱ्यांना वसंतराव नाईक कृषि प्रतिष्ठानच्या वतीने कृषी गौरव पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाला मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठं विधान केलं आहे संजय राठोड यांचे मोठे विधान मंत्री संजय राठोड यांनी कृषी गौरव पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, हा पुरस्कार नसून नव्या पिढीला दिलेला





ठेवा आहे. मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री कार्यक्रमाला येऊ शकले नाही त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. संकटग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळात चर्चा सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा करतील. महायुतीच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचा उल्लेख आहे. राज्याच्या प्रमुखांकडून लवकरच याची घोषणा केली जाईल.. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही दिले होते संकेतयाआधी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही शेतकरी कर्जमाफीबाबत भाष्य केलं होतं. मी शेतकरी पुत्र आहे. माझा जन्म शेतकऱ्याच्या घरात झाला आहे. सकाळी उठलो तरी मला शेती दिसते, त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी मला माहिती आहेत. शेतकरी कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री योग्यवेळी निर्णय घेतील असं भरणे यांनी म्हटलं होतं. त्यामुळे आता आगामी काळात कर्जमाफीचे संकेत मिळाले आहेत. कर्जमाफी झाल्याने शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. बऱ्याच शेतकऱ्यांनी पीककर्ज काढून पिकांची लागवड केली होती, मात्र दुष्काळामुळे अनेकांच्या पिकांचे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत, त्यामुळेच वारंवार कर्जमाफीची मागणी करण्यात येत आहे.

## भांडुपमध्ये राज्यस्तरीय मराठी भाषा काव्य संमेलन उत्साहात पार

भांडुप, ९ ऑगस्ट : मराठी भाषेचा गौरव, कविता संस्कृतीचे संवर्धन आणि नव्या पिढीतील काव्यप्रतिभांचा सन्मान या त्रिवेणी संगमाने भारलेले राज्यस्तरीय मराठी भाषा काव्य संमेलन भांडुपमध्ये मोठ्या जल्लोषात पार पडले. कोकण पाटील साहित्य परिषद व स्वर्णिका पुस्तक प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने रामानंद आर्य डीएवी कॉलेज येथे झालेल्या या भव्य कार्यक्रमाने मराठी काव्यजगत एकत्र आणले. कार्यक्रमाच्या उद्घाटनाला कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त प्रमुख पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रा. प्रदीप ढवळ, ज्येष्ठ कवी अशोक बागवे, लोकप्रिय कवी अरुण मात्रे, ज्येष्ठ संपादक सुकृत खांडेकर, उद्योगपती रतन टाटा यांचे सचिव योगेश जोशी, कोमसाप



मुंबई जिल्हा अध्यक्ष मनोज वराडे, साहित्यिक मिलिंद कुलकर्णी, धनंजय पाटील आणि इतर मान्यवरांची गौरवशाली उपस्थिती लाभली. ३०० कवितांतून निवडक कलाकृतींचा गौरव,महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या जवळजवळ तीनशे कवितांचे परीक्षण करून निवडक कवितांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये नवोदित कवींसोबतच अनुभवी कविंनाही सन्मानित करण्यात आले. यावेळी स्व रचित काही उत्कृष्ट कवितांचाही विशेष सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे रसिकांना भूतकाळातील गंध पुन्हा अनुभवता आला.

माजी शिक्षणाधिकारी, मुंबई महानगरपालिका डॉ. जिवबा रामचंद्र केळुसकर यांनी दोन महिने परिश्रम घेऊन या कार्यक्रमाची संकल्पना ते अंमलबजावणीपर्यंतची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. परीक्षणाची जबाबदारी प्रा. संतोष राणे आणि प्रा. प्रज्ञा पंडित यांनी काटेकोरपणे पार पाडली. सकाळी 9 वाजता भव्य ग्रंथ दिंडीने संमेलनाची सुरुवात झाली. पुस्तकांच्या मिरवणुकीने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी संमेलनाच्या दिवशी रक्षाबंधन आणि ९ ऑगस्ट क्रांती दिन यांची सांगड घातल्याने कार्यक्रमाला विशेष ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कविता वाचनाच्या सत्रांमध्ये सभागृहात टाळ्यांचा गजर, कौतुकाची हाळी आणि भावना व्यक्त करणारे स्मित हे क्षण विशेष ठरले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूजा काळे यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या नेमक्या व संवेदनशील शब्दांनी कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा सहज आणि भावपूर्णरीत्या जोडला गेला. या राज्यस्तरीय काव्य संमेलनाने मराठी काव्यजगताला नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला असून, आयोजकांच्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## स्वदेशीचा नारा योग्यच !

तुम्ही भारतीय असाल तर भारतीय वस्तूच खरेदी करा आणि सणासुदीच्या काळात भारतीय वस्तूंवर विश्वास दाखवून त्या मोठ्या प्रमाणावर खरेदी करा हा पंतप्रधान मोदी यांनी केलेली सूचना योग्यच आहे.आपण ज्या देशात राहतो त्या देशातील नागरिकांनी बनविलेल्या वस्तू खरेदी करण्यासाठी केव्हाही प्राधान्य द्यायला हवे.सध्या अमेरिकेने भारतावर ५० टक्के टेरीफ लावण्याचे सूतोवाच केले असून अशावेळी वोकल फॉर लोकल चा मंत्र अवलंबिण्याची वेळ आली आहे.आपण बनविलेल्या वस्तू आपणच जर खरेदी केल्या तर एखाद्या भारतीय कामगाराला आणि गरीब नागरिकाला आधार तर मिळेलच पण प्रत्येक विक्रीतून मिळालेला पैसा भारतातच राहील आणि तो भारतीयांच्या विकासासाठी आणि हितासाठी वापरता येईल.भारतीयांच्या खरेदी क्षमतेत वाढ होऊन देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यासाठी पाठबळ मिळेल.देशात बनविलेली उत्पादने विकण्यास दुकानदारांना आणि भारतीयांना त्या वस्तू खरेदी करण्यास नक्कीच अभिमान वाटेल.तेव्हा आपण पण स्वतः आपल्याला भारतीय मानत असू, आपल्या राष्ट्राबद्दल आपल्याला आदर असेल तर नक्कीच आपण स्वदेशी वस्तू घेण्यास आणि वापरण्यास सुरुवात करायला हवी.बरेच वर्षापूर्वी राजीव दीक्षित या भारतीय नागरिकाने स्वदेशी वस्तू वापरण्यासाठी नारा दिला होता त्याची आठवण या निमित्ताने झाली.

## शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या
### किसान सभेचे अर्जुन आडे यांची मागणी...

किनवट, दि१८: किनवट व माहूर तालुक्यात मागील तीन दिवसांपासून होत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेती पीकांचे अतोनात नुकसान झाले आहे.तहसील प्रशासनाने पिकांची पहाणी करून शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई द्यावी,अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेच्या राज्य शाखेचे उपाध्यक्ष अर्जुन आडे यांनी केली आहे.किनवट व माहूर तालुक्यात मागील तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. यामुळे नदी,नाले व ओढ्यांना पूर आले आहेत व पुराचे पाणी शेतीमध्ये शिरल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.नदी नाल्या काठच्या शेतजमीनी पाण्याच्या प्रवाहामुळे खरडून गेल्या आहेत.तसेच अनेक शेतकऱ्यांचे शेतामधील सौर ऊर्जेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे संबंधित यंत्रणांनी तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी कॉ.आडे यांची मागणी आहे.

## दिव्यांगाना हक्काच्या निधीसाठी उपोषणाची वेळ
### शासनाकडून मंजूर असूनही सोमठाणा ग्रामपंचायत निधी देईना

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : दिव्यांग बांधवांसाठी शासनाकडून प्रत्येक ग्रामपंचायतीला पाच टक्के निधी मंजूर असूनही नायगाव तालुक्यातील सोमठाणा ग्रामपंचायत मात्र अनेक वर्षांपासून दिव्यांगांचा निधी देत नसल्याची तक्रार दिव्यांग बांधव तिरुपती विठ्ठल कदम यांनी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तर दिव्यांग बांधवांचा पाच टक्के निधी लवकरात लवकर वाटप करण्यात यावा यामागणीसाठी सोमठाणा ग्रामपंचायती




समोर दिव्यांग बांधव १८-ऑगस्ट पासून आमरण उपोषणास बसले आहेत.

सविस्तर माहिती अशी की नायगाव तालुक्यातील सोमठाणा ग्रामपंचायत ने शासनाकडून येणारा दिव्यांग बांधवांचा पाच टक्के निधी हा २०२१ पासून अद्याप पर्यंत पाच टक्के निधी दिला नसल्याची लेखी तक्रार दिव्यांग बांधवांनी पंचायत समिती जिल्हा परिषद शासन दरबारी पाठपुरावा करूनही सोमठाणा ग्रामपंचायत सरपंच, ग्रामविकास अधिकारी मात्र याकडे सपशेल दुर्लक्ष करत आहेत.यामुळे दिव्यांग बांधवांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. दिव्यांगांच्या या थकीत निधीच्या मागणीसाठी दिव्यांग बांधव तिरुपती विठ्ठल कदम यांनी आपल्या दिव्यांग बांधवांसोबत ग्रामपंचायत समोर उपोषण सुरू केले आहे.दिव्यांग बांधवांचा हक्काचा मंजूर असलेला निधी देण्यासाठी सोमठाणा ग्रामपंचायत एवढी टाळाटाळ का करते आहे.असा प्रश्न दिव्यांग बांधवांना पडला आहे. शासनाकडून निधी येऊनही जर ग्रामपंचायत देत नसेल तर या ग्रामपंचायतीवर पंचायत समिती जिल्हा परिषद शासनाचा काही वचक आहे ? हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच आहे.

## मराठे धडकणार मुंबईवर ; पाटोदा तालुक्यात मराठा सेवकांकडून जनजागृतीवर भर
### मराठा सेवक गजानन बेदरे, सुग्रीव पवार, राहुल कवठेकर यांच्यासह मराठा सेवक सक्रिय!

**प्रत्येक गावात जाऊन जनजागृती ; रात्रीच्या बैठकांवर जोर [हॅशटॅग घरी बसला.. तो मराठा कसला!]**

पाटोदा | प्रतिनिधी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी 29 ऑगस्ट रोजी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला आहे. लाखोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबईला येणार असल्याची माहिती मिळत आहे. पाटोदा तालुक्यातील लाखोच्या संख्येने मराठा बांधव मुंबईला येणार आहेत त्यासाठी पाटोदा तालुक्यातील मराठा सेवक कामाला देखील लागले आहेत रात्रंदिवस वाडी वस्तीवर बैठका घेऊन पोम्प्लेट देऊन मुंबईला येण्यासाठी आव्हान करत आहे मराठा सेवक गजानन बेदरे सुग्रीव पवार राहुल कवठेकर यांच्यासह हजारो मराठा बांधव रात्रंदिवस एक करत मराठा समाजामध्ये जनजागृती करून 29 ऑगस्टला मुंबईच्या दिशेने निघण्यासाठी आव्हान करत आहेत.. 27 ऑगस्ट रोजी अंतरवली पासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनासाठी लाखो मराठे निघणार आहेत. आंतरवाली–शहागड–पैठण मार्ग – शेवगाव–पांढरी पुल – आळेफाटा – शिवनेरी दर्शन – कल्याण चेंबूर – आझाद मैदान असा मार्ग ठरवण्यात आला आहे. प्रत्येक ठिकाणी लाखोंच्या संख्येने मराठा बांधव या रॅलीत सहभागी होणार आहेत. ठिकठिकाणी जंगी स्वागत केलं जाणार आहे. या रॅलीत पाठवता तालुक्यातील देखील लाखो बांधव सहभागी होणार असून त्यासाठी जनजागृती मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मराठा सेवकांनी रात्रंदिवस एक करून रॅलीत लाखोच्या संख्येने मराठा बांधव सहभागी होऊन आझाद मैदानाच्या दिशेने निघावेत यासाठी जनजागृतीच रान पेरले जात आहे. ही जनजागृती भविष्यासाठी आहे सगळे सोयरे जीआर तात्काळ मंजूर




करण्यासाठी आहे सगळे सोयऱ्याचा कायदा पारित केल्याशिवाय मुंबई सोडणार नाही असा ठाम निश्चय केला आहे. ही लढाई शेवटची असल्याने गेल्या वेळेस पेक्षा दुप्पट संख्येने मराठा बांधव या 29 ऑगस्ट च्या आंदोलनात सहभागी होणार आहेत. असंही बोललं जात आहे... पाटोदा तालुक्यातून लाखोच्या संख्येने मराठा बांधव सहभागी होणार आहेत आपणही मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आव्हान मराठा सेवक गजानन बेदरे, सुग्रीव पवार, राहुल कवठेकर यांच्यासह पाटोदा तालुक्यातील सर्व मराठा सेवकांकडून करण्यात आले आहे.. हॅशटॅग घरी बसला.. तो मराठा कसला!

### मुंबईला कशासाठी जायचं!

१) न्याय हक्कासाठी
२) मराठा समाजाच्या हक्काच्या आरक्षणासाठी
३) दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीसाठी
४) सरकारला जागे करण्यासाठी
५) शांततेच्या मार्गाने आरक्षणाची मागणी ठामपणे मांडण्यासाठी

सोशल मीडियावर घरी बसेल तो मराठा कसला हॅशटॅक वापरून जोरदार प्रचार सुरू केला आहे. 29 ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा नवीन क्रांती घडणार आहे. त्यामुळे सर्व मराठा बांधवांनी क्रांती घडवण्यासाठी आणि त्याचे साक्षीदार होण्यासाठी मुंबईतील आझाद मैदानात पूर्ण ताकतीने येण्याचे आव्हान केले आहे... हॅशटॅग घरी बसला.. तो मराठा कसला..

### आंदोलनातील प्रमुख मागण्या

१) मराठा कुणबी एकच असल्याचा जीआर काढा.
२) हैदराबाद सातारा बॉम्बे गॅजेट लागू करा.
३) मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या..
४) मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या वारसांना सरकारी नोकरी व आर्थिक मदत तात्काळ द्यावी..

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com